## प्रकरण सहावे

# सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

# प्रकरण सहावे - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी


६.१ प्रास्ताविक

६.२ संशोधनाचा सारांश

- ६.२.१ संशोधन समस्येचे शब्दांकन
- ६.२.२ संशोधनाची उद्दिष्टे
- ६.२.३ संशोधनाच्या मर्यादा
- ६.२.४ संशोधन पध्दती
- ६.२.५ संशोधनाची साधने
- ६.२.६ संशोधनाची जनसंख्या
- ६.२.७ संशोधनाच्या संकलित सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
- ६.२.८ निष्कर्ष आणि शिफारशी

६.३ निष्कर्ष आणि शिफारशी

- ६.३.१ प्रस्तावना
- ६.३.२ अध्यापकांची शैक्षणिक अर्हता व अनुभव
- ६.३.३ मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीची कारणे
- ६.३.४ प्रथम वर्षातील मराठी विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकाचा सहसंबंध गुणक
- ६.३.५ प्रथम वर्षातील हिन्दी विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकाचा सहसंबंध गुणक
- ६.३.६ प्रथम वर्षातील इंग्रजी विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकाचा सहसंबंध गुणक
- ६.३.७ प्रथम वर्षातील इतिहास विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकाचा सहसंबंध गुणक
- ६.३.८ प्रथम वर्षातील भूगोल विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकाचा सहसंबंध गुणक
- ६.३.९ अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व प्रथम वर्षीच्या इतर विषयातील प्राप्तांकाच्या सहसंबंध गुणकांवरुन लावलेला अन्वयार्थ

६.४ सर्वसाधारण निष्कर्ष आणि शिफारशी

६.५ पुढील संशोधनासाठी काही विषय

## ६.१ प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरण संशोधन अहवालातील अंतिम प्रकरण असून प्रकरणाच्या सुरुवातीला "सारांश" शीर्षकाखाली यापूर्वीच्या प्रकरणांचा आढावा घेतला आहे. प्रत्येक प्रकरणातील संकलित माहिती, निष्कर्ष आणि शिफारशी काढण्यास सहाय्यभूत ठरले आहेत. समस्या शीर्षकापासून पुढील संशोधनासाठीच्या विषयापर्यन्तची माहिती या प्रकरणात अंतर्भूत केलेली आहे.

## ६.२ संशोधनाचा सारांश

प्रास्ताविकांतर्गत अभ्यासविषय सुचण्याचे कारण, अभ्यास विषयाचे महत्त्व सांगितले आहे.

### ६.२.१ संशोधन समस्येचे शब्दांकन

"बी.ए.बी.एड्. एकात्मिक अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटीची उपयुक्तता तपासून तिची सप्रमाणता सिध्द करणे."

समस्या कथनाबरोबरच समस्येतील संज्ञांचे स्पष्टीकरण केले आहे.

### ६.२.२ संशोधनाची उद्दिष्टे

१. दोन अध्यापन पध्दती पैकी एक अध्यापन पध्दती निवडणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रवेश कसोटी तयार करणे.

२. या अनुबंध कसोटीची उपयुक्तता तपासणे.

३. या अनुबंध कसोटीची सप्रमाणता निश्चित करणे.

### ६.२.३ संशोधनाच्या मर्यादा

हे संशोधन शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या बी.ए.बी.एड्. महाविद्यालयापुरतेच मर्यादित आहे.

### ६.२.४ संशोधन पध्दती

संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. यामध्ये सर्वेक्षण पध्दतीचे महत्व, नमुना निवड, संशोधन सामुग्री गोळा करण्याची साधने, संशोधनाची कार्यवाही, संशोधनासाठी तयार केलेल्या प्रश्नावल्या व त्यांचे विश्लेषण इत्यादींचा समावेश केलेला आहे.

### ६.२.५ संशोधनाची साधने

संशोधिकेने संशोधनासाठी मुलाखत व प्रश्नावली या साधनांचा वापर केलेला आहे. मराठी अध्यापन पध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी, मराठी अध्यापन पध्दती शिकविणाऱ्या अध्यापकांसाठी आणि वरिष्ठ महाविद्यालयात मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांसाठी प्रश्नावली व मुक्त स्वरुपाच्या मुलाखती या साधनांचा वापर केला आहे. तसेच अनुबंध कसोटीच्या उताऱ्याचाही वापर केलेला आहे.

### ६.२.६ संशोधनाची जनसंख्या

शिवाजी विद्यपीठांतर्गत गारगोटी येथील कर्मवीर हिरे बी.ए.बी.एड्. महाविद्यालय आणि महावीर महाविद्यालय बी.ए.बी.एड्. विभाग, कोल्हापूर या दोनच ठिकाणी बी.ए.बी.एड्. चा अभ्यासक्रम सुरु असल्याने संशोधिकेने या दोनही महाविद्यालयांची आणि द्वितीय वर्षात मराठी अध्यापन पध्दती निवडलेल्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांची निवड केलेली आहे.

### ६.२.७ संशोधनाच्या संकलित सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन या प्रकरणात केलेले आहे. अध्यापक प्रश्नावलीतील प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद तसेच प्रशिक्षणार्थी प्रश्नावलींना मिळालेला प्रतिसाद, प्रथम वर्षातील वैकल्पिक विषयात प्राप्त झालेले गुण व अनुबंध कसोटीतील गुण यांचा सहसंबंध गुणक इत्यादी माहिती कोष्टकाद्वारे व्यक्त केलेली आहे.

### ६.२.८ निष्कर्ष आणि शिफारशी

संकलित माहितीचे विश्लेषण केले असून त्यावर आधारित निष्कर्ष काढले आहेत व शिफारशी केल्या आहेत. तसेच पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात आले आहेत.

## ६.3 निष्कर्ष व शिफारशी

### ६.3.१ प्रस्तावना

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय "बी.ए.बी.एड्. एकात्मिक अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटीची उपयुक्तता तपासून तिची सप्रमाणता सिध्द करणे" हा असून अनुबंध कसोटीची उपयुक्तता व सप्रमाणता याबाबतचा विचार केलेला आहे. मागील प्रकरणात "अ" विभागात अध्यापकांसाठी प्रश्नावली व "ब" विभागात प्रशिक्षणार्थ्यांसाठीच्या प्रश्नावलीद्वारा प्राप्त झालेल्या सामग्रीचे विश्लेषण करुन अर्थनिर्वचन केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात त्यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी सादर केलेल्या आहेत. तसेच पुढील संशोधनासाठी काही विषयही सुचविण्यात आले आहेत.

### ६.3.२ अध्यापकांची शैक्षणिक अर्हता व अनुभव

सारणी क्रमांक ५.१ अ (पहा प्रकरण पाच पृष्ठांक ७६ ) वरुन असा निष्कर्ष निघतो की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्यापन पध्दती शिकविण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता पाचही अध्यापकांकडे आहे.

सारणी क्रमांक ५.१ ब (पहा प्रकरण पाच पृष्ठांक ७७ ) वरुन असा निष्कर्ष निघतो की, वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापन करण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता पाच पैकी चार अध्यापकांनी मिळविलेली आहे. एका अध्यापकाकडे आवश्यक शैक्षणिक अर्हता कमी

असल्याचे दिसून येते. पाच पैकी दोन अध्यापकांकडे किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक अर्हता आहे.

सारणी क्रमांक ७.२ (पहा प्रकरण पाच पृष्ठांक ७८ ) वरुन खालील निष्कर्ष निघतात,

प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांच्या अनुभवाचा विस्तार चार वर्षापासून ते बावीस वर्षापर्यन्त आहे. याचाच अर्थ असा होतो की, अध्यापन व्यवसायात नुकत्याच पदार्पण केलेल्या अध्यापकांपासून ते बावीस वर्षे इतका दीर्घ अनुभव असलेल्या सर्व प्रकारच्या अनुभवी अध्यापकांचा समावेश झालेला आहे.

अध्यापकांच्या अनुभवाची सरासरी काढली असता हा सरासरी अनुभव एका तपाहून अधिक असल्यामुळे तो दीर्घ अनुभव आहे असे मानावयास हरकत नाही.

### ६.3.3 मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीची कारणे

सारणी क्रमांक ७.३ (पहा प्रकरण पाच पृष्ठांक ८० ) वरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रशिक्षणार्थ्यांनी मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीची वेगवेगळी कारणे दिलेली आहेत. त्या कारणांना मिळालेल्या प्रतिसादांच्या संख्येसह ती उतरत्या क्रमाने दिली आहेत.

| अ.क्र. | कारणे | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मराठी मातृभाषा आहे म्हणून | ३४ | ३९.६ |
| २. | आवडता व सोपा विषय म्हणून | ३० | ३४.८ |
| ३. | मराठी विषयाचे महत्व पटविण्यासाठी | १२ | १३.९ |
| ४. | मराठी विषयाचा उत्कृष्ट शिक्षक होण्यासाठी | १० | ११.७ |

वरील कारणांचा विचार करता असे नमूद करावेसे वाटते की, मराठी अध्यापन पध्दती निवडण्यासाठी निश्चित निकष लावलेले दिसत नाहीत. अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटीची उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

### ६.३.४ प्रथम वर्ष मराठी विषयातील प्राप्तांक व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकाचा सहसंबंध गुणक

सारणी क्रमांक ७.४ (अ) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक ८३ ) वरुन असे दिसून येते की, कर्मवीर हिरे बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याच प्रशिक्षणार्थ्यांचे प्रथम वर्ष मराठी विषयातील प्राप्तांक यांचा सहसंबंध गुणक ०.७१ इतका असून धन आहे हा सहसंबंध मध्यम स्वरुपाचा आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, केवळ प्रथम वर्षाला मराठी विषय होता म्हणून त्या प्रशिक्षणार्थ्याला मराठी अध्यापन पध्दती देता येणार नाही. मराठी अध्यापन पध्दती देण्यापूर्वी अनुबंध कसोटीद्वारा त्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्राविण्य पाहून मगच त्यांना मराठी अध्यापन पध्दती निवडू दिली जावी.

सारणी क्रमांक ७.४ (ब) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक ८५) वरुन असे दिसून येते की, महावीर महाविद्यालयातील बी.ए.बी.एड्. विभागातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याचे प्रशिक्षणार्थ्यांचे प्रथम वर्ष मराठी विषयातील प्राप्तांक यांचा सहसंबंध गुणक ०.७८ आहे. हा सहसंबंध गुणक धन आहे. हा मध्यम प्रतीचा असला तरी ०.७० च्या जवळपास पोहोचणारा वाटतो. तरीही मराठी अध्यापन पध्दती देताना प्रथम त्यांना अनुबंध कसोटी दिली जावी व त्यातील प्राप्त गुणानुसार मराठी अध्यापन पध्दती दिली जावी.

### ६.३.७ प्रथम वर्षातील हिन्दी विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकांचा सहसंबंध गुणक

सारणी क्रमांक ७.७ (अ) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक ८९ ) वरुन असे दिसून येते की, कर्मवीर हिरे बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याच प्रशिक्षणार्थ्यांचे प्रथम वर्ष हिन्दी विषयातील प्राप्तांक यांचा सहसंबंध गुणक ०.१२ इतका आहे. हा सहसंबंध धन असला तरी तो दुर्लक्षण्याजोगा आहे.

सारणी क्रमांक ७.७ (ब) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक ९२ ) वरुन असे दिसून येते की, महावीर महाविद्यालयातील बी.ए.बी.एड्. विभागातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याच प्रशिक्षणार्थ्यांचे प्रथम वर्ष हिन्दी विषयातील प्राप्तांक यांचा सहसंबंध गुणक ०.४७ इतका असून तो धन स्वरुपाचा आहे. हा सहसंबंध मध्यम स्वरुपाचा असला तरी ०.४० कडे झुकणारा आहे.

वरील सहसंबंध हे अनुक्रमे दुर्लक्षणीय आणि मध्यम स्वरुपाचे आहेत. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रथम वर्षाला हिंदी विषय असलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षाला मराठी अध्यापन पध्दती निवडू देण्यास सबळ पुरावा किंवा कारण होऊ शकणार नाही. सबब, प्रथम वर्षाला हिंदी असणाऱ्यांना प्रथम वर्षाला हिंदी हा भाषा विषय आहे म्हणून मराठी अध्यापन पध्दती हाही भाषा विषय आहे म्हणून घेऊ देऊ नये. त्यांचे मराठी भाषेचे ज्ञान व प्रभुत्व पाहण्यासाठी योग्य अशी अनुबंध कसोटी देऊन त्या कसोटीतील गुणांच्या निकषावरच मराठी अध्यापन पध्दती घेऊ दयावी.

## ६.३.६ प्रथम वर्षातील इंग्रजी विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकांचा सहसंबंध गुणक

सारणी क्रमांक ७.६ (अ) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक १५) वरुन असे दिसून येते की, कर्मवीर हिरे बी.ए.बी.एड्. महाविद्यालयात प्रथम वर्षी इंग्रजी विषय घेतलेली एकच प्रशिक्षणार्थी असल्याने याठिकाणी सहसंबंध गुणक काढता आलेला नाही. त्यामुळे संशोधिकेला अचूक निष्कर्ष मांडण्यात अडचणी आल्या.

सारणी क्रमांक ७.६ (ब) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक १८) वरुन असे दिसून येते की, महावीर महाविद्यालयातील बी.ए.बी.एड्. विभागातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याच प्रशिक्षणार्थ्यांचे प्रथम वर्षीच्या इंग्रजी विषयातील प्राप्तांकांचा सहसंबंध गुणक - ०.६१ इतका आहे. तो सहसंबंध ऋण स्वरुपाचा आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रथम वर्षी इंग्रजी विषय असणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना द्वितीय वर्षात मराठी अध्यापन पध्दती दिली जाऊ नये.

## ६.३.७ प्रथम वर्षातील इतिहास विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकांचा सहसंबंध गुणक

सारणी क्रमांक ७.७ (अ) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक १७) वरुन असे दिसून येते की, कर्मवीर हिरे बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याच प्रशिक्षणार्थ्यांचे प्रथम वर्ष इतिहासातील प्राप्तांक यांचा सहसंबंध गुणक ०.२७ इतका आहे. हा सहसंबंध कमी स्वरुपाचा आहे.

सारणी क्रमांक ७.७ (ब) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक १९) वरुन असे निदर्शनास येते की, महावीर महाविद्यालयातील बी.ए.बी.एड्. विभागातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याच

प्रशिक्षणार्थ्यांचे प्रथम वर्ष इतिहासातील प्राप्तांक यांचा सहसंबंध गुणक ०.१९ इतका आहे. हा सहसंबंध धन असून दुर्लक्षण्याजोगा आहे.

वरील सहसंबंध हे अनुक्रमे अल्प आणि दुर्लक्षणीय आहेत. त्यामुळे प्रथम वर्षाला इतिहास विषय असलेल्या प्रशिक्षणार्थ्याला द्वितीय वर्षाला मराठी ही अध्यापन पध्दती निवडू देण्यास सबळ पुरावा किंवा कारण होऊ शकणार नाही. सबब, द्वितीय वर्षाला मराठी अध्यापन पध्दती घेऊ देऊ नये. त्यांचे मराठी भाषेचे ज्ञान व प्रभुत्व पाहण्यासाठी योग्य अशी अनुबंध कसोटी देऊन त्या कसोटीतील गुणांच्या निकषावरच अध्यापन पध्दती घेऊ दयावी.

## ६.३.८ प्रथम वर्षातील भूगोल विषयातील व अनुबंध कसोटीतील प्राप्तांकांचा सहसंबंध गुणक

सारणी क्रमांक ७.८ (अ) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक १०१) वरुन असे दिसून येते की, कर्मवीर हिरे बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याच प्रशिक्षणार्थ्यांचे प्रथम वर्ष भूगोलातील प्राप्तांक यांचा सहसंबंध गुणक .१९ इतका आहे. हा सहसंबंध गुणक धन असला तरी दुर्लक्षण्याजोगा आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रथम वर्षी भूगोल विषय असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना द्वितीय वर्षासाठी मराठी अध्यापन पध्दती दिली जाऊ नये. जर त्यांना अध्यापन पध्दती द्यावयाचीच असेल तर अनुबंध कसोटी देऊन त्यातील गुणानुसार अध्यापन पध्दती दिली जावी.

सारणी क्रमांक ७.८ (ब) (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक १०५) वरुन असे दिसून येते की, महावीर महाविद्यालयातील बी.ए.बी.एड्. विभागातील द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व त्याच प्रशिक्षणार्थ्यांचे भूगोल विषयातील प्राप्तांक यांचा सहसंबंध गुणक - ०.१२ इतका आहे. तो सहसंबंध ऋण आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की,

प्रथम वर्षी भूगोल विषय असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना द्वितीय वर्षासाठी मराठी अध्यापन पध्दती दिली जाऊ नये.

### ६.३.९ अनुबंध कसोटीतील प्राप्तांक व प्रथम वर्षातील इतर विषयातील प्राप्तांकांच्या सहसंबंध गुणकावरुन लावलेला अन्वयार्थ

सारणी क्रमांक ७.९ (पहा प्रकरण ७ वे पृष्ठांक १०८) वरुन असे दिसून येते की, प्रथम वर्षातील मराठी विषयातील प्राप्तांक व अनुबंध कसोटीतील प्राप्तांक यांचा सहसंबंध मध्यम स्वरुपाचा असला तरी हा सहसंबंध गुणक इतर वैकल्पिक विषयातील प्राप्तांक व अनुबंध कसोटीतील प्राप्तांक यांच्या सहसंबंधापेक्षा जास्त आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रथम वर्षी मराठी विषय असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रथम अनुबंध कसोटी देऊन मगच त्यांना मराठी अध्यापन पध्दती दिली जावी.

संशोधिका या ठिकाणी असे नमूद करु इच्छिते की, कर्मवीर हिरे बी.ए.बी.एड्. महाविद्यालयात प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रथम वर्षातील त्या-त्या विषयाच्या गुणानुसारच त्यांना अध्यापन पध्दती सक्तीने दिली जाते. तथापि, महावीर महाविद्यालयात मात्र प्रशिक्षणार्थ्यांना इच्छेनुसार अध्यापन पध्दती निवडू दिली जाते म्हणूनच की काय कर्मवीर हिरे बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या प्राप्तांकांच्या सहसंबंध गुणकांपेक्षा महावीर महाविद्यालयातील बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या प्राप्तांकांच्या सहसंबंध गुणक अधिक असलेला दिसून येतो.

सबब, द्वितीय वर्षाला अध्यापन पध्दती घेऊ देताना अध्यापन पध्दतीची सक्ती करण्यात येऊ नये. अशी सक्ती करणे कदाचित प्रशासनाच्या दृष्टीने सोयीस्कर असले तरी ते अशैक्षणिक आहे.

## ६.४ सर्वसाधारण निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणाच्या आतापर्यन्तच्या भागात प्रश्नावलीला मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण, विश्लेषण, संश्लेषण करुन लावलेल्या अन्वयार्थावर आधारित शिफारशी केल्या. या शिफारशी करताना घेतलेल्या मुक्त स्वरुपाच्या मुलाखती, प्रश्नावली यांचाही उपयोग केला. तथापि सर्वच शिफारशींचा समावेश करता आला नाही. काही सर्वसाधारण शिफारशी करावयाच्या राहिल्या. त्या पुढील परिच्छेदातून केलेल्या आहेत.

१. बी.ए.बी.एड्. महाविद्यालयात अध्यापन पध्दती निवडीसाठी निश्चित निकष लावले जात नाहीत. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठामार्फतच प्रत्येक बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातून अनुबंध कसोटीद्वारा अध्यापन पध्दती निवडू दिली जावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

२. मातृभाषेचे अध्यापन कुशलपणे करण्यासाठी सक्षम शिक्षक तयार करणे ही आजची गरज आहे. यासाठी प्रशिक्षणार्थ्यांची भाषिक कौशल्ये अजमावण्यासाठी अनुबंध कसोटीचा वापर केला जावा.

३. बी.ए.बी.एड्. महाविद्यालयात मराठी शिवाय हिन्दी आणि इंग्रजी या अध्यापन पध्दती निवडण्याची सोय असते. प्रस्तुत अध्यापन पध्दती निवडतेवेळी त्या-त्या विषयातील अनुबंध कसोटी देऊन अध्यापन पध्दती निवडू दिली जावी.

## ६.५ पुढील संशोधनासाठी काही विषय

प्रस्तुत प्रकरणाच्या आतापर्यन्तच्या भागात या संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी सादर केल्या. हे संशोधन करत असताना संशोधिकेला काही समस्या जाणवल्या. त्या समस्या प्रस्तुत संशोधन विषयाशी प्रत्यक्ष संबंधित नसल्यामुळे संशोधिकेने त्या समस्यांच्या मूळापर्यन्त जाऊन त्यांचा सखोल, सांगोपांग व तपशीलवार परामर्श घेतलेला नाही. तथापि, या समस्यांचा अशा प्रकारे अभ्यास केल्यास तो प्रस्तुत संशोधन समस्येच्या

सर्वांगिण सम्यक् आकलनास उपकारक होईल असे वाटते. या समस्यांचा खालील परिच्छेदांतून पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

१. प्रस्तुत संशोधनातील बी.ए.बी.एड्. महाविद्यालयात मराठी प्रमाणेच इंग्रजी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटी उपयोगी ठरेल का? याविषयी स्वतंत्र संशोधन होणे आवश्यक आहे.

२. अध्यापक महाविद्यालयातही (डी.एड्.) अध्यापन पध्दतीसाठी कोणते निकष लावले जातात? तेथे अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटी उपयोगी ठरेल का? याविषयी संशोधन होणे आवश्यक आहे.

३. मराठी विषयांप्रमाणेच इतर भाषा विषयांचे अध्यापन कुशलपणे करण्यासाठी सक्षम शिक्षकांची गरज आहे. यासाठी प्रशिक्षणार्थ्यांच्या भाषिक कौशल्याचा विकास कितपत झाला आहे हे पाहण्यासाठी अनुबंध कसोटीचा वापर करता येईल का? याचा शोध घेणे.

४. बी.ए.बी.एड्. प्रशिक्षण काळात अनुबंध कसोटीद्वारा अध्यापन पध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे माध्यमिक स्तरावर अध्यापन परिणामकारक होते का? याचा शोध घेणे.

५. कोणताही निकष न लावलेली मराठी अध्यापन पध्दती निवडलेले प्रशिक्षणार्थी व अनुबंध कसोटीद्वारा मराठी अध्यापन पध्दती निवडलेले प्रशिक्षणार्थी यांच्या अध्यापनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

६. बी.ए.बी.एड्. महाविद्यालयात मराठीप्रमाणेच इंग्रजी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटी उपयुक्त ठरेल का? याविषयी स्वतंत्र संशोधन होणे आवश्यक आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची

**(मराठी - इंग्रजी)**

# संदर्भ ग्रंथ सूची

**मराठी** -


१) अकोलकर, ग. वि., पाटणकर, ना. वि. - "मराठीचे अध्यापन" (पूणे - व्हीनस प्रकाशन, १९७०)

२) बापट, भा. गो. - "शैक्षणिक संशोधन" (पूणे - नूतन प्रकाशन, १९८८.)

३) भिंताडे, वि.रा.,- "शैक्षणिक संशोधन पध्दती" ( पूणे - नूतन प्रकाशन, १९८९.)

४) करंदीकर, सुरेश - "मराठी अध्यापन पध्दती" (कोल्हापूर - फडके प्रकाशन, १९९६)

५) कुंडले, म. बा. - "मराठीचे अध्यापन" (पूणे - श्रीविद्या प्रकाशन)

६) जगताप, ह. ना. - "शैक्षणिक तंत्रज्ञान" (पूणे-नूतन प्रकाशन, १९९१.)

७) दांडेकर, वा. ना. - "शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र" (पूणे - श्रीविद्या प्रकाशन १९७४.)

८) पाटणकर, ना. वि., पाटील, लीला - "मराठीचे अध्ययन आणि अध्यापन" (पूणे - व्हीनस प्रकाशन, १९७०)

९) पाटील, एल्. एस्., - "शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटीची उपयुक्तता पडताळून सप्रमाणता सिध्द करणे." (कोल्हापूर - शिवाजी विद्यापीठ, डिसेंबर १९९७.)

१०) मुळे, रा. श., उमाठे, वि. तु. - "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे" (नागपूर -महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, १९८७.)

११) माळी, एम्. जी. - "<u>शैक्षणिक प्रश्न पुनर्रचना आणि राष्ट्रविकास</u>" (पूणे - निळकंठ प्रकाशन, १९७०.)

१२) वाळंबे, मो. रा. - "<u>सुगम मराठी व्याकरण लेखन</u>" (पुणे - नितिन प्रकाशन, १९९०.)

१३) सराफ, रा. सो. - "<u>भाषा, मातृभाषा आणि परभाषा</u>" (पुणे - श्रीविद्या प्रकाशन, १९७२.)

१४) साहित्यसाधना - संपादक समिती - प्रा.भैरव कुंभार, डॉ.ल.रा.नसिराबादकर, प्राचार्य बा.ना.शिंदे, प्रा.वि.द. कदम, १९९४.

ENGLISH -

1) Best, John W. - "Research In Education" (Reprint New Delhi - Prentic Hall of India Pvt. Ltd., 1963)

2) Buch, M.B. - "The Survey of Research In Education" (Baroda : Center of Advance Study In Education, M.S. University, 1974.)

3) Buch, M.B. - "The Second Survey of Research In Education" (1972-78), (Baroda : Society for Educational Researcj and Development, 1979)

4) Buch, M.B. - "Third Survey of Research In Education" (1978-83), (N.C.E.R.T., 1987)

5) E.L.T.C. - Correspondance Course In Modern Techniques of Testing and Evaluation, Unit-5, "Testing overall Language Ability." : The Cloze Procedure, (E.L.T. Center, Shivaji University, Kolhapur) (Manugraphed), 1988.

6) Garrett, H.E. - "Statistics In Psychology And Education" (Delhi - Common Wealth Publishers, 1988.)

7) Gefen Rlaphael - "An Experiment with Cloze Testing" (E.L.T.,33.2, P.P. 122 - 126), 1979.

8) Kulkarni, S.V. - "A Battery of Cloze Tests For College's Enterance" (Ph.D. Dissertation - Shivaji University, Kolhapur, 1996.)

9) N.C.E.R.T. - "Third Indian Year Book of Educational Research" (New Delhi - N.C.E.R.T., 1969.)

10) N.C.E.R.T. - "Educational Investigation In Universities" (1939-61), (New Delhi - N.C.E.R.T., 1963.)

11) N.C.E.R.T. - "The International Encyclopedia of Educational Research and Studies" Vol. 9 (New Delhi - N.C.E.R.T., 1991.)

12) N.C.E.R.T. - "Fifth All India Educational Survey" Vol. I, II (New Delhi - N.C.E.R.T., 1992.)

13) Pandey, S.B., Kundle, M.B. (Ed.), "Abstracts of Doctoral Research In Education", (Nagpur - Secretary, Shikshan Sameeksha, 1987)

14) Patil, P.A. - "Cloze Technique As An Instrument In Determining The Authenticity of Teaching Materials" (M.Phil. Dissertation - Shivaji University, Kolhapur, 1993.)

15) Patole, N.K. (Ed.), - "Educational Research In Universities of Maharashtra, Platinum Jubilee Year" Volume, (Bombay - Principal, S.T.College, 1983)

16) Sawant, S.K. - "The Effect of Varying 'N' In Cloze Procedure" (M.Phil Dissertation - Shivaji University, Kolhapur, 1989.)

17) Shastri, S.V. - "The Cloze Test As a measure of Language Proficiency For India", (Journal of Shivaji University, Vol - 19), 1980.

18) Singh, N. - "Modernization of Teacher Education" (New Delhi - Common Wealth Publishers, 1988.)

19) State Institute of Education - "Educational Investigation In Universities In Maharashtra" (1939-70), (Poona - State Institute of Education, 1972.)

20) Weinman - "Cloze Testing of Second Language Learners" (E.L.T. Journal, 33.2, P.P. 126-132), 1979.

# प रि शि ष्टे

# परिशिष्ट "अ"

कु . कुलकर्णी एम्.ए.
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
पेठवडगांव.
दिनांक :-

मा.प्रा.श्री./श्रीमती ------------------------

---------------------------------------------

विषय :- अनुबंध कसोटीसाठी मराठी विषयाच्या तज्ज्ञ अध्यापकांकडून उतारा निश्चित करणेबाबत....

महोदय,

बी.ए.बी.एड्. एकात्मिक अभ्यासक्रमांत दोन अध्यापन पध्दती निवडणे हा महत्वाचा भाग आहे. यामध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटी कितपत उपयुक्त आहे हे तपासून पाहणे हा माझा एम्.फिल्. संशोधनाचा विषय आहे. त्यासाठी प्रा.डॉ.आर.बी.देवस्थळी हे मार्गदर्शक आहेत.

मातृभाषेचे अध्यापन कुशलपणे करण्यासाठी सक्षम शिक्षक तयार करणे ही आजची गरज आहे, व या गरजेतूनच संशोधिकेला ही समस्या जाणविली. अनुबंध कसोटीसाठी उतारा निश्चित करताना भाषिक कौशल्यांचा विचार करुन सोबतचा उतारा योग्य अथवा अयोग्य आहे याचे आपण मार्गदर्शन करावे. आपल्या उतारा निवडीच्या मार्गदर्शनाचा उपयोग केवळ माझ्या संशोधनाच्या कामासाठीच केला जाईल.

आपण उतारा करण्यासाठी केलेल्या मार्गदर्शनामुळे मला अनुबंध कसोटी तयार करण्यास दिशा मिळणार असल्याने आपले मत लवकरात लवकर द्यावे ही विनंती. माझ्या संशोधनासाठी आपण सहकार्य कराल असा विश्वास आहे. तरीही सहकार्याबद्दल विनंती.

तसदीबद्दल क्षमस्व.

आपली,

(.कु.कुलकर्णी एम्.ए.)

## मराठी विषयाच्या तज्ज्ञ अध्यापकांची वैयक्तिक माहिती

१. अध्यापकाचे नांव - ______________________
(आडनांव प्रथम)

२. महाविद्यालयाचे नांव - ______________________

३. कायमचा राहण्याचा पत्ता - ______________________
______________________

४. शैक्षणिक पात्रता - ______________________
पदवीचा विषय - पदव्युत्तर विषय -

५. बी.एड्. च्या अध्यापन पध्दती - १. ______________
२. ______________

६. अध्यापनाचा अनुभव - ______________________

७. उतारा निश्चित करणेसंबंधीचे मत -
______________________
______________________
______________________

## अनुबंध कसोटी उतारा क्रमांक - १

तुकारामानंतर जनतेचा एवढा महाकवी या महाराष्ट्रांत होऊन गेला नाही, गुरुजींचा उद्‌गार हा जनतेचा उद्‌गार होता. म्हणूनच गुरुजींचे काव्य हे कोटी कोटी जीवांचे वृंदगान झाले. गुरुजी म्हणत, "मोठमोठ्या साहित्यिकांप्रमाणे माझ्या वाङ्.मयांत हिरे-मोती आढळणार नाहीत. पुष्कळांना ते पै किंमतीचे वाटेल. पण भूक लागली असता हिरे उपयोगी पडत नाहीत. त्यावेळी पै किंमतीचे डोळे मुरमुरेच पृथ्वीमोलाचे वाटतात." गरीब आणि श्रमजीवी जनतेची सर्व दुःखे आणि दुखणी दूर व्हावीत ही गुरुजींच्या जीवनांतली एकच तळमळ होती. ती तळमळ गुरुजींनी आपल्या वाङ्.मयात ओतली आहे. म्हणून त्यांनी लिहिलेल्या प्रत्येक अक्षराअक्षरात आणि ओळीओळीत त्यांचे हृदय प्रकट झाले आहे. "माझ्या वाङ्.मयाला हात लावाल, तर माझ्या हृदयाला लावाल" असे ते म्हणत. असे फार थोडे आणि भाग्यशाली कवी नि लेखक जगात असतात की, ज्यांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन त्यांच्या काव्यात आणि वाङ्.मयात होते. साने गुरुजींचे वाङ्.मय मात्र असे आहे की, वाक्यावाक्यांत आणि कडव्याकडव्यांत तुम्हांला गुरुजींच्या निर्मळ आणि पवित्र मूर्तीचे दर्शन होईल. समाजपुरुषाशी साने गुरुजी इतके समरस झाले होते की, सागराप्रमाणे सर्व नद्या, झरे आणि ओहोळ त्यांनी आपल्या विशाल व्यक्तिमत्वामध्ये शोषून घेतले होते. कोकणातल्या व देशातल्या खेडोपाड्यामध्ये हिंडून तेथील म्हाताऱ्या बायाबापड्यांकडून त्यांनी कहाण्या, उखाणे, ओव्या, गाणी, गोष्टी, आख्यायिका आणि दंतकथा यांची प्रचंड संपत्ती गोळा करुन आणली. अशा प्रकारे कोकणामध्ये दापोली तालुक्यात उगम पावलेली गुरुजींच्या जीवनाची सरिता दऱ्याखोऱ्यांतल्या ओहोळांचे, पानांचे आणि फुलांचे अर्घ्य घेत घेत, प्राचीन सारस्वतांच्या अभ्यासाने समृध्द होत होत आणि आधुनिक काळांतील मोठमोठ्या पर्वतांच्या पायांचे प्रक्षालन करीत करीत सर्व महाराष्ट्रभर पसरली आणि लक्षावधी लोकांच्या वैराण नि खडकाळ आयुष्यात तिने शांतीची आणि समाधानाची पिके पिकवून सर्वत्र आनंदीआनंद करुन टाकला.

## अनुबंध कसोटी उतारा क्रमांक - २

सकाळच्या वेळी स्नान पूजा आटोपून बाकाबाई समोरच्या सोप्यात बसली होती, अबोलीचा गजरा तिनं आपल्या अंबाडयात माळला होता. डावा पाय उंचावून, उजवा पाय पसरुन त्या अंगठयामध्ये बांधलेल्या दो-यानं शेजारच्या तबकातल्या फुलांचा गजरा ती गुंफत होती, तोंडातल्या पानाची पिंग पिकदाणीत टाकून तबकातल्या फुलांना हात घालणार तोच खाकरण्याचा आवाज तिच्या कानावर आला. तिन पाहिलं तो, रघु गुरव दारात उभा होता. त्याला पाहताच बाकाबाईच्या चेह-यावर स्मित उमटलं. पानाने रंगलेले आपले ओठ तांबडया लुगडयाच्या पदरानं पुसत ती म्हणाली,

" ये रघू बस."

रघू गुरव कोळीवाडयातला किराणमालाचा दुकानदार होता. बुटका, डोक्याला चुरगळलेली काळी टोपी. अंगात काळा कोट आणि पायात काचा मारलेलं दुटांगी धोतर असा रघू गुरवाचा वेश.

आपल्या डोक्यावरची मळकट टोपी उगीचच सरळ करीत रघू गुरव बाकाबाईनं अंथरलेल्या चटईवर बसला. धोतराच्या सोग्यानं घाम टिपत रघू गुरव म्हणाला,

"बाकाबाई, काय चाललंय ?"

"पोरीचे गजरे करुन ठेवले " म्हणत बाकाबाईनं पानाचा डबा रघू गुरवासमोर सरकवला. तो डबा उघडत असता बाकाबाईनं विचारलं,

"सकाळी बरं सवड झाली ?"

"सकाळ केव्हाच सरली. आज शनिवार ना । दुकान बंद. सकाळी केस कापून घेतले, स्नान केलं. म्हटलं तुम्हाला भेटून जावं."

"आणि हातातून काय आणलसं " रघूच्या हातातल्या दोन सुरळयांकडे पाहात बाकाबाईनं विचारलं.

"काही नाही. पण बाकाबाई, तुमच्या पोरींनी नांव काढलं हो ।"

"नांव ?"

"तर काय ?" आज सुगंधा, कमला घरोघर पोहोचल्या. रघू गुरवाच्या हसण्याबरोबर त्याच्या काळया चेह-यावरचे पांढरे दात चमकत होते. बोलता बोलता त्यानं जुळवलेलं पान तोंडात टाकल.

## अनुबंध कसोटी उतारा क्रमांक - ३

बंछी सुमारे बारा वर्षाचा असावा. उन्हाने आणि उघडयावरच्या वापराने त्याचा चेहरा रापला तरी तो लालवट गोरा होता. नाक काहीसे लांब असून, कपाळातून निघताच उचललेले असल्यामुळे, त्याचा रुंदट चेहरा सुशोभित दिसे. बंछीचे डोळे घारे - बदामी रंगाचे असून, उन्हाच्या तिरपीने त्यात तांबडया रेषा उमटलेल्या होत्या. त्याच्या डाव्या गालावर लहानसे निळसर ल्हासे असून ओठ सारखे मिटून धरण्याची त्याला सवय होती. गेल्या दोन वर्षापासून त्याच्या हनुवटीवर एक लांबच्या लांब वण पडला होता. जसा काही काटे-याने निघालेला ओरखडा भरुन निघाला आहे. मांडीपासून त्याच्या पायाचा घाट व पावलांचा मलीन सुकुमारपणा शहरात शाळेत जाणा-या मुलालाच शोभला असता. बंछी बोलू लागला म्हणजे त्याच्या आवाजाची पातळ किनारी एखादया आडवळणी गोठयात परिसची पेटी वाजवावी तशी एकू येई. रानावनातून एकटेदुकटेही पळावे आणि प्रसंग पडल्यास मागून खावे हे त्याच्या अंगवळणी पडले होते. ओढयाच्या काठी बसून आपले धुळीने भरलेले आणि ओरखडयांनी भेगाळलेले अंग त्याने दगडाने खरखरुन घासून धुतले म्हणजे मळलेला तांबूस ताप्ता धुवावा तसा तो दिसे. झाडो-यातील घरटी हुसकताना तो इतर पोरांबरोबर असला तरी दूरदूरच असे. अंडी किंवा पिले सापडली म्हणजे बेम्टया, तवळया, धाक्या ही पोरे आनंदाने नाचू लागत पण बंछीला कसेसेच वाटे. ती सगळी मुले त्याला भारी भजत. त्याच्या भोवती उभी राहून ती त्याच्या तोंडाकडे पाहात, तो सांगेल ते ती ऐकत, तो एखादेवेळी दमला भागला तर हाताची पालखी करुन ती त्याला घरी नेत.

## अनुबंध कसोटी उतारा क्रमांक ४

दुस-या महायुध्दानंतरच्या जगात युध्द टाळणे व राष्ट्राराष्ट्रांनी बंधुभावाने रहाणे एवढयानेच सर्व प्रश्न सुटणार नव्हते. अमेरिका व रशिया ही प्रचंड बलवान व सुधारलेली राष्ट्रे होती. आणखी काही राष्ट्रे अंशीच सुधारलेली होती. पण या सर्वांची एकूण लोकसंख्या सा-या जगाच्या लोकसंख्येच्या मानाने फार थोडी होती. " *आशिया व आफ्रिका या प्रचंड खंडांत जी कित्येक कोटी जनता रहाते तिचे भवितव्य काय ?"* याचा विचार नेहरु १९४४ साली *अहमदनगरच्या तुरुंगात* ' डिस्कव्हरी ऑफ इंडिया ' ग्रंथ लिहिताना आपल्या मनाशी करीत होते.

या कोटयावधी लोकांना आपल्या भवितव्याबद्दल जाणीव होऊ लागली आहे. आपण जगाचे नागरिक आहो हेही त्यांना कळले आहे. जगातल्या घटनांकडे ते आस्थापूर्वक पाहतात. या घटना चांगल्या की वाईट हे ठरविण्याची त्यांची कसोटी त्यांच्या भवितव्यावर यांचा काय परिणाम होतो यावरुन ठरणार होती. त्यामुळे आपण स्वतंत्र होऊ काय, अंकित राष्ट्रे स्वतंत्र होतील काय, स्वातंत्र्य मिळून परस्पर सहकार्याने नांदण्याचे स्वातंत्र्य मिळेल काय, निरनिराळी राष्ट्रे व त्यांतील अंतर्गत गट या सर्वांना समता व समान संधी मिळेल काय, दारिद्र्य, निरक्षरता व गदळ रहाणी यातून या राष्ट्रांची मुक्तता होईल काय इ. या प्रश्नांची उत्तरे त्यांना हवी आहेत. आशिया-आफ्रिका खंडातील लोक राष्ट्रवादी आहेत. पण त्यांना फक्त स्वातंत्र्यच नको असून दुस-या कोणावर साम्राज्य स्थापावे अशी त्यांना इच्छा नाही. त्यांना आंतरराष्ट्रीय सहकार्य व आंतरराष्ट्रीय संघटना हवी आहे. पण जुनेच साम्राज्यशाही वर्चस्व नव्या स्वरुपात अंमलात येणार नाही ना अशी त्यांना शंका व भिती वाटते. आशिया व आफ्रिका यातील पुष्कळ प्रदेश *जागृत* झाले आहेत, त्यांच्यात *असंतोष* खदखदतो आहे. *आज ज्या परिस्थितीत ही राष्ट्रे आहेत ती परिस्थिती ही राष्ट्रे आता अधिक काळ सहन करण्यास तयार नाहीत. "*

## अनुबंध कसोटी उतारा क्रमांक - ७

कोनार्कच्या भिंतीवर नृत्यांगना नाचत आहेत. कोणी मृदंगी वाजवीत आहेत. कोणी मदनमंजिरी मंजरीवर ताल धरीत आहेत. कोणी वेतसतनु वेणू वाजवीत आहेत. कोणी सौंदर्याच्या दर्पामध्ये दर्पणात पाहत आहेत. कोणी विवस्त्र असून दिमाखात ताठ उभ्या आहेत. कोणी सवस्त्र असून लाजेने चूर आहेत. पण सर्वात कहर आहे कामोन्मत्तांचा. कामवासनेने पेटलेल्या मनाला न कसली लज्जा, न संकोच हे जरी खरे असले तरी, कोनार्कच्या भिंतीवरचा अनिर्बंध निर्लज्जपणा एकप्रकारे उबगच आणतो. दोन जीवांच्या मिलनाची प्रतिमा जरी कोणी चित्रित केली तरी त्यात अश्लील काहीच नाही, पण इथे सामूहिक समागम, विकृत अंगसंग, विचित्र आसनबंध, एक न दोन उग्र व उत्तान प्रकार कशासाठी चित्रित व्हावेत हे समजत नाही. निकोप आणि सुविहित प्रणय उद्वेग आणीत नाही. कामी जनांची उत्सुकता, ईर्ष्या, असूया, परस्परांवर जय मिळवण्याची इच्छा, परस्परांना पिऊन टाकण्याची असोशी, रसरशीत सौंदर्याचे रसरसून केलेले आस्वादन या गोष्टींनी रसिकाच्या मनाचा आनंद वाढेलच यात काय संशय? आंतरिक आकर्षणाशिवाय जसा शरीरसंग गलिच्छ आहे, तसे सौदर्यग्रहणाशिवाय अन्य हेतूने केलेले मैथुनचित्रणही सुसंस्कृत मनाला तिरस्करणीय वाटते. पण योग असा होता की, मूर्तिशिल्पाचा उत्कर्ष झाला त्याच काळी प्राचीन भारतीय सामाजिक सभ्यतेचा अपकर्ष झालेला होता.

## परिशिष्ट "ब"

कु . कुलकर्णी एम्.ए.
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
पेठवडगांव.
दिनांक :-

मा.प्राचार्य,

------------------------------------------

------------------------------------------

अर्जदार : कु.कुलकर्णी एम.ए.

विषय :- बी.ए.बी.एड. द्वितिय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता अनुबंध कसोटीसाठी परवानगी मिळणे बाबत....

महोदय,

मी कु.कुलकर्णी एम.ए. शिक्षण शास्त्रमध्ये एम.फिल. करीत आहे. सदर शोध प्रबंधासाठी ' मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनंबंध कसोटीची उपयुक्तता तपासून तिची सप्रमाणता सिद्ध करणे ' हा माझा संशोधनाचा विषय आहे. त्यासाठी प्रा.डॉ.रा.भा.देवस्थळी हे मार्गदर्शक आहेत.

सदर शोध निबंधसाठीची चाचणी बी.ए.बी.एड. मधील द्वितिय वर्षाच्या ( **फक्त मराठी अध्यापन पध्दती असलेल्या**) विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. सदर चाचणीचा उपयोग केवळ माझ्या संशोधनाच्या कामासाठीच केला जाईल. सदर चाचणीसाठी एक तासाचा कालावधी लागेल. तरी आपण सदर चाचणीसाठी परवानगी द्यावी ही विनंती.

कळावे

आपली,

(.कु.कुलकर्णी एम्.ए.)

## प्रशिक्षणार्थी प्रश्नावली

१. प्रशिक्षणार्थ्याचे नांव :
(आडनाव प्रथम)

२. महाविद्यालयाचे नांव :

३. राहण्याचा पत्ता :

४. चालू वर्षी प्रवेश घेतलेला वर्ग :

५. बी.ए.बी.एड्.अध्यापन पध्दती :

अ.

ब.

६. प्रथम वर्षात मराठी विषयात प्राप्त केलेले गुण :

७. मराठी अध्यापन पध्दती निवडीची कारणे :

## अनुबंध कसोटी उतारा

तुकारामानंतर जनतेचा एवढा महाकवी या महाराष्ट्रांत होऊन गेला नाही, गुरूजींचा उद्‌गार हा जनतेचा उद्‌गार होता. म्हणूनच गुरूजींचे काव्य हे कोटी कोटी जीवांचे वृंदगान झाले. गुरूजी म्हणत, "मोठमोठ्या साहित्यिकांप्रमाणे माझ्या वाड्.मयांत हिरे-मोती -------------------- नाहीत पुष्कळांना ते पै किंमतीचे वाटेल. पण भूक --------- असता हिरे उपयोगी पडत नाहीत. त्यावेळी ------ किंमतीचे डोळे मुरमुरेच पृथ्वीमोलाचे वाटतात." गरीब आणि श्रमजीवी ---------- सर्व दुःखे आणि दुखणी दूर व्हावीत ही ---------- जीवनांतली एकच तळमळ होती. ती तळमळ गुरूजींनी ---------- वाड्.मयात ओतली आहे. म्हणून त्यांनी लिहिलेल्या प्रत्येक ---------- आणि ओळीओळीत त्यांचे हृदय प्रकट झाले आहे. "---------- वाड्.मयाला हात लावाल, तर माझ्या हृदयाला लावाल" ---------- ते म्हणत. असे फार थोडे आणि भाग्यशाली ---------- नि लेखक जगात असतात की, ज्यांच्या व्यक्तिमत्वाचे ---------- त्यांच्या काव्यात आणि वाड्.मयात होते. साने गुरूजींचे ---------- मात्र असे आहे की, वाक्यावाक्यांत आणि कडव्याकडव्यांत ---------- गुरूजींच्या निर्मळ आणि पवित्र मूर्तीचे दर्शन होईल. ---------- साने गुरूजी इतके समरस झाले होते की, ---------- सर्व नद्या, झरे आणि ओहोळ त्यांनी आपल्या ---------- व्यक्तिमत्वामध्ये शोषून घेतले होते. कोकणातल्या व देशातल्या ---------- हिंडून तेथील म्हाताऱ्या बायाबापड्यांकडून त्यांनी कहाण्या, उखाणे, ---------- गाणी, गोष्टी, आख्यायिका आणि दंतकथा ह्यांची प्रचंड ---------- गोळा करुन आणली. अशा प्रकारे कोकणामध्ये दापोली ---------- उगम पावलेली गुरूजींच्या जीवनाची सरिता दऱ्याखोऱ्यांतल्या ओहोळांचे, ---------- आणि फुलांचे अर्ध्य घेत घेत, प्राचीन सारस्वतांच्या ---------- समृध्द होत होत आणि आधुनिक काळांतील मोठमोठ्या पर्वतांच्या पायांचे प्रक्षालन करीत करीत सर्व महाराष्ट्रभर पसरली आणि लक्षावधी लोकांच्या वैराण नि खडकाळ आयुष्यात तिने शांतीची आणि समाधानाची पिके पिकवून सर्वत्र आनंदीआनंद करुन टाकला.

## परिशिष्ट "क"

**प्रश्नावलीला प्रतिसाद देणा-या अध्यापकांची यादी.**

| अ.नं. | अध्यापकाचे नांव | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|---|
| १. | डॉ.प्रा.कळके जे.एन. | कर्मवीर हिरे आर्टस्,कॉमर्स, सायंन्स आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी |
| २. | डॉ.प्रा.पाटील पी.ए. | कर्मवीर हिरे आर्टस्,कॉमर्स, सायंन्स आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी |
| ३. | प्रा.गवस आर.जी. | कर्मवीर हिरे आर्टस्,कॉमर्स, सायंन्स आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी |
| ४. | प्रा.सौ.पाटील एन.आर. | महावीर महाविद्यालय, बी.ए.बी.एड. विभाग, कोल्हापूर. |
| ५. | प्रा.गावडे जी.ओ. | महावीर महाविद्यालय, बी.ए.बी.एड. विभाग, कोल्हापूर. |
| ६. | प्रा.दळवी जे.एम. | महावीर महाविद्यालय, बी.ए.बी.एड. विभाग, कोल्हापूर. |
| ७. | प्रा.सांगले के.एन. | बी.एड्कॉलेज, पेठवडगांव. |
| ८. | प्रा.दिक्षित एस.एस. | एस.पी.एस.कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली |
| ९. | प्रा.माळकर व्ही.एस. | एस.एम.टी.टी.कॉलेज, कोल्हापूर. |
| १०. | प्रा.सौ.पाटील एल.एस. | एस.एम.टी.टी.कॉलेज, कोल्हापूर. |

## परिशिष्ट "ड"

**प्रश्नावलीला प्रतिसाद देणा-या प्रशिक्षणार्थ्यांची महाविद्यालयानुसार यादी**

१ कर्मवीर हिरे आर्टस्, कॉमर्स, सायंन्स आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.

१. कु.आजगेकर शिल्पा शामराव
२. कु.भोपळे वैशाली पांडुरंग
३. कु.देसाई प्रतिभा गणपतराव
४. श्री.गुरव शिवाजी नारायण
५. श्री.गुरव संजय शरद
६. श्री.गोंड राजू पांडुरंग
७. कु.हळदकर संगिता आनंदराव
८. कु.जोशी संध्या पांडुरंग
९. श्री.कडते विलास तुकाराम
१०. कु.कांबळे बिजली बाळासो
११. श्री.कांबळे बाबासो दत्तू
१२. श्री.मांडे दत्तात्रय धोंडीराम
१३. श्री.पवार महादेव तारु
१४. श्री.पवार धनराज विष्णू
१५. श्री.पाटील संतोष महादेव
१६. कु.पाटील उज्वला बाबुराव
१७. श्री.पाटील बळवंत गुंडू
१८. श्री.पाटील बाळाराम सदानंद
१९. कु.साळवी वंदना दत्तात्रय
२०. श्री.सानप नेताजी मच्छिंद्र
२१. कु.सावंत नंदिनी दत्तात्रय
२२. श्री.शेटये रामचंद्र वसंत
२३. श्री.शेजाळ कल्लाप्पा बिराप्पा
२४. श्री.सोनाळकर दिलीप केरबा
२५. श्री.टिपुगडे विश्वास सदाशिव
२६. श्री.थोरवत आनंदा पांडुरंग
२७. श्री.वाघमारे युवराज नानासो

२ महावीर महाविद्यालय बी.ए.बी.एड. विभाग

१. श्री.बरगे धोंडिराम गोपाळ
२. श्री.चव्हाण-पाटील कुंडलीक विठ्ठल
३. श्री.धावजे सचिन चंद्रहार
४. श्री.गळतगे मिलींद महादेव
५. कु.गवंडी मिनाज इस्माईल
६. श्री.गोडसे पांडुरंग भगवान
७. कु.हातरोटे सविता वसंतराव
८. श्री.हुकीरे सत्यम वसंतराव
९. श्री.इंगळे संजय मच्छिंद्र
१०. श्री.कदम प्रविण भगवान
११. श्री.कांबळे किरण केरु
१२. श्री.कादे अमोल भरत
१३. कु.कुंभार विद्यागौरी शिवाजी
१४. श्री.कोप्पे प्रकाश मल्लाप्पा
१५. श्री.लंबे मुकुंद महादेव
१६. श्री.लुपजे अमर विरुपाक्ष
१७. श्री.मगदूम उत्तम तात्यासो
१८. श्री.माने रमेश बाबू
१९. श्री.माने संतोष जिन्नाप्पा
२०. श्री.मरगर राजू श्रीमंत
२१. कु.मोरे संगीता शंकर
२२. श्री.नंदीवाले प्रकाश लक्ष्मण
२३. कु.नंदुरे कविता कल्लाप्पा
२४. श्री.पाटील भानुदास भगवान
२५. कु.पाटील कोजागिरी महादेव

२६. श्री.पाटील पांडुरंग चंद्रकांत
२७. श्री.पाटील प्रशांत विष्णुपाद
२८. कु.पाटील रेखा मधुकर
२९. श्री.पाटील संदिप भगवान
३०. श्री.पाटील सुभाष दौलतराव
३१. कु.पाटील वैशाली नामदेव
३२. श्री.पेडणेकर विलासराव जयवंत
३३. श्री.पोवार अशोक बाबुराव
३४. कु.पोवार सुरेखा मोहन
३५. कु.साजणे वैशाली मधुकर
३६. श्री.सणगर नविनचंद्र रंगराव
३७. कु.संकपाळ नंदिनी पांडुरंग
३८. श्री.शेंडगे संजय मनोहर
३९. श्री.ठोमके सुनिल कुंडलिक
४०. श्री.वडार परशराम तिमाण्णा
४१. कु.यमगेकर सिंधु रामू
४२. कु.पाटील उज्वला दत्तात्रय